Indian Journal of Social Sciences and Literature Studies
ISSN 2349-5634 (Print) ISSN 2455-0973 (Online)
Vol. 5, Issue 1, March 2019

# माहिती तंत्रज्ञान व महिला सक्षमीकरण

माधवी महेश पोफळे –टिपरे
समाजश्री प्रशांतदादा हिरे कनिष्ठ महाविद्यालय,
रावळगाव, ता. मालेगाव, जि. नाशिक

**प्रास्ताविक :**

आजचे युग हे माहिती तंत्रज्ञानाचे युग आहे. माहिती तंत्रज्ञानामध्ये समाजाच्या राजकीय, आर्थिक, सामाजिक जडणघडणीमध्ये आज फार मोठा वाटा आहे. माहिती तंत्रज्ञानाशिवाय आजच्या युगामध्ये समाजाची प्रगती शक्यच नाही. भारतासारख्या लोकसंख्येने फार मोठ्या देशात माहिती तंत्रज्ञान अजूनही शेवटच्या टप्प्यापर्यंत पोहोचले नाही. माहिती तंत्रज्ञानामध्ये आज करण्यासारखे खूप काही आहे. माहिती तंत्रज्ञानाचा उपयोग विविध क्षेत्रांमध्ये केला जातो. त्याच्याच एका बाबीचा विचार येथे मांडला आहे. माहिती तंत्रज्ञानाच्या आधारे स्त्री सबलीकरण कसे करता येणे शक्य आहे. माहिती तंत्रज्ञानाच्या आधारे स्त्रियांची सामाजिक आर्थिक, राजकीय प्रगती कशाप्रकारे करू शकतील माहिती तंत्रज्ञानाचा उपयोग शिक्षण, आरोग्य सांस्कृतिक, विकास कशा प्रकारे होऊ शकतो हा अभ्यास प्रस्तुत संशोधन निबंधामध्ये मांडला आहे.

**लिंगभेद** :

भारतासारख्या विकसनशील देशात आजही लिंगभेदाचे प्रकार दिसतात. स्त्रियांना आजही बऱ्याच ठिकाणी विविध प्रकारच्या बंधनात ठेवलेले आढळते. त्यांच्यावर विविध निर्बंध लादलेले असतात. स्त्रियांना पुरुषाप्रमाणे विविध क्षेत्रांमध्ये प्रगती करण्याची संधी दिली जात नाही. ग्रामीण भागामध्ये आजही मुलगा हा मुलीपेक्षा वरचढ मानला जातो. लिंगभेदाचे प्रकार राष्ट्राच्या विकासामध्ये फार मोठी अडचण ठरतो. त्यामुळे राष्ट्राच्या सर्वांगीण विकासाची क्षमता खुंटीत होते.

**सरकारी योजना आणि स्त्री सबलीकरण**

भारतासारख्या मोठ्या प्रजासत्ताक देशात स्त्रियांना त्यांच्या विविध मानवी अधिकारापासून दूर ठेवले जात आहे असे लक्षात आले तेव्हा स्त्री सबलीकरणाची जाणीव व्यक्त झाली. आणि पाचव्या पंचवार्षिक योजनेमध्ये (१९७४–७८), स्त्री सबलीकरण उपायांवर तरतूद करयात आली. १९९० च्या कायद्यानुसार राष्ट्रीय महिला आयोगची स्थापना करण्यात आली. १९९३ च्या कायद्या अंतर्गत स्त्रियांना ग्रामपंचायत, स्थानिक राजकीय संस्थामध्ये आरक्षण देण्यात आले. या विविध योजनांच्या माध्यमातून स्त्रियांच्या प्रत्यक्ष सहभागावर भर देण्यात आला. त्या माध्यमातून त्यांचे सक्षमीकरण करता येणे शक्य झाले.

**माहिती तंत्रज्ञानाचा प्रसार**

माहिती तंत्रज्ञानाचा प्रसार अतिशय महत्त्वाचा आहे. माहिती तंत्रज्ञानाशिवाय प्रगती शक्य नाही हे सत्य आहे परंतु त्या करिता त्याचा प्रसार होणे आवश्यक आहे. माहिती तंत्रज्ञानाचे ज्ञान, उपयोग, वापर हा तळागाळातल्या ग्रामीण भागात राहणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला प्राप्त होणे क्रमप्राप्त आहे. त्याकरिता काही उपाय योजना शक्य आहे.

- माहिती तंत्रज्ञानाचा प्रसार ग्रामीण भागामध्ये करणे.
- प्रसारासाठी भौतिक सुविधांची उभारणी करणे.
- Wireless आणि उपग्रह संवाद दळणवळणाची सोय ग्रामीण भागापर्यंत पोहचविणे.
- विविध खाजगी संस्था यांच्या सहकार्याने माहिती तंत्रज्ञानाची उभारणी करणे.

इत्यादी विविध माध्यमातून माहिती तंत्रज्ञानाचा प्रसार केल्यानंतर अतिशय महत्त्वाची गोष्ट आहे.

**स्त्री शिक्षण** :

स्त्री शिक्षण ही अतिशय महत्त्वाची गोष्ट आहे. स्त्रियांचे आयुष्य हे केवळ चूल आणि मूल यांच्या पुरतेच मर्यादित होते. परंतु, आज शिक्षणाचे महत्त्व सर्व स्तरांना कळले आहे. स्त्रिया ज्या शिकून कुटुंबाला योग्य संस्कार देऊ शकतील स्वत:च्या पायावर उभ्या राहू शकतील. केवळ पुस्तकी शिक्षण न घेता व्यवहारोपयोगी शिक्षण मिळणे महत्त्वाचे आहे.

स्त्रियांनी स्वत:पुढे येऊन शिक्षण सोबत आधुनिक शिक्षण पद्धतीचा स्वीकार करायला हवा. माहिती तंत्रज्ञानाचा होणारा उपयोग व त्याचे महत्त्व लक्षात घेता स्त्रियांना त्यासंबंधी शिक्षण देणे अतिशय महत्त्वाचे आहे.

- स्त्रियांचे ग्रामीण भागात विविध गट तयार करून त्यांना माहिती तंत्रज्ञानाचे खिक्षण देणे.
- माहिती तंत्रज्ञानाचा होणारा उपयोग स्त्रियांच्या लक्षात आणून देणे.
- माहिती तंत्रज्ञान शिकलेल्या स्त्रियांना विविध क्षेत्रामध्ये प्रत्यक्ष सहभागासह कामाच्या संधी उपलब्ध करून देणे.
- माहिती तंत्रज्ञानाच्या उपयोग स्त्री सक्षमीकरणासाठी कसा उपयुक्त आहे. याची जाणीव स्त्रियांमध्ये निर्माण करणे.
- माहिती तंत्रज्ञान क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या विविध कंपन्यांनी महिलांना काम करण्याची संधी उपलब्ध करणे व स्त्रियांना प्रोत्साहित करणे. सरकारने विविध योजना अंतर्गत स्त्रियांना रोगार प्राप्त करून देणे.

- विविध कर्तृत्ववान स्त्रियांना समोर आणून समाजापुढे त्यांचा आदर्श निर्माण करणे. जेणे करून स्त्रियांना माहिती तंत्रज्ञानाचे महत्त्व पटेल.

**माहिती तंत्रज्ञान आणि स्त्री सक्षमीकरण**

**स्त्रियांचा सामाजिक विकास**

**शिक्षण**

शिक्षण हेच सर्वांगिण विकासाचे एकमेव साधन आहे. शिक्षणाने स्त्रियांना स्वत:च्या अस्तित्वाची जाणीव होऊन त्यांची आर्थिक सामाजिक, राजकीय, प्रगती शक्य होईल. माहिती तंत्रज्ञानाच्या शिक्षणाने त्यांना जगातील आधुनिक शिक्षण पद्धतीचा उपयोग करता येईल व त्यातून स्वत:ची व समाजाची प्रगती साध्य करता येईल. शिक्षणाने त्यांचा सामाजिक स्तर उंचावला जाईल.

**आर्थिक प्रगती**

**दारिद्र्य निर्मुलन**

भारतात दारिद्र्य रेषेखाली राहणारी स्त्रियांची संख्या फार मोठी आहे. माहिती तंत्रज्ञानामध्ये स्त्री दारिद्र्य निर्मुलनाच्या विविध योजना आहेत. त्यांच्या आधारे स्त्रिया स्वत:ची व कुटुंबाची आर्थिक प्रगती साध्य करू शकतील. माहिती तंत्रज्ञान क्षेत्रामध्ये अशा विविध योजना आहेत. ज्या स्त्रियांना आर्थिक आणि सामाजिक प्रगतीच्या विधिध संधी उपलब्ध करून देतात.

**जागतिकीकरण**

आज जगाचे रूपांतर हे Global village मध्ये झाले आहे. जागतिकीकरणाच्या स्पर्धेमध्ये टिकण्यासाठी माहिती तंत्रज्ञानाचा प्रसार ग्रामीण भागाच्या टोकापर्यंत होणे गरजचे आहे. जागतिकीकरणामध्ये रोजगाराच्या विविध संधी आहेत. आज माहिती तंत्रज्ञान क्षेत्रामध्ये रोजगार हा स्त्री–पुरूष भेदावर नाही तर कौशल्यावर प्राप्त होतात. माहिती तंत्रज्ञानावर आधरित उद्योग आज महिला सक्षमीकरणामध्ये जबाबदारीने पावले उचलत आहेत. स्त्रियांना रोजगाराच्या संधी देत आहेत. माहिती तंत्रज्ञानाचा उपयोग हा जागतिकीकरणामध्ये किती महत्त्वाचा आहे हे जाणून त्यांचा स्वीकार स्त्रियांनी करायला हवा.

**शेती**

ग्रामीण भागात शेती हाच निर्वाहाचा मुख्य व्यवसाय आहे. बहुतेक स्त्रिया या शेती व्यवसायात आहे. स्त्रियांसाठी माहिती तंत्रज्ञान येथेही उपयोगी पडते. माहिती तंत्रज्ञानाच्या आधारे बाजारातील विविध नवनवे बियाणे, खते, औषधे यांची माहिती मिळते. उत्पादित वस्तूला योग्य भावाची बाजारपेठ याची माहिती उपलब्ध

होते. तसेच शेतीचे विविध पूरक व्यवसाय जसे मत्स्य, कुक्कुटपालन, रेशीम उद्योग अशा विविध व्यवसायाची माहिती त्या द्वारे मिळविता येते. माहिती तंत्रज्ञानाने हवामानाचे अंदाज, विविध शेती अवजारे, उपकरणे यांची देखील माहिती मिळते. त्यासाठी ज्या स्त्रिया शेती व्यवसाय करतात त्यांनी माहिती तंत्रज्ञान याचे शिक्षण घेतले पाहिजे व त्यातून स्वत:ची प्रगती साध्य केली पाहिजे.

**उद्योजिका**

आज ग्रामीण भागात स्त्रिया गटांच्या मार्फत विविध लघुउद्योग उभे करत आहे. E-Commerce च्या माध्यमातून त्या आपली उत्पादने जगाच्या समोर मांडू शकतात व त्याला बाजारपेठ उपलब्ध करून देऊ शकतात.

## Online व्यवसाय

हे माहिती तंत्रज्ञानाचे आजचे मोठे व्यापक रूप आहे. Online व्यवसायाने बऱ्याच प्रमाणात स्त्रियांना रोजगार उपलब्ध करून दिले आहेत. स्त्रियांचे कौशल्यपूर्ण बोलणे, त्यांची वस्तु विकण्याची हातोटी यावर त्यांना बरेच रोजगार प्राप्त झाले आहेत.

माहिती तंत्रज्ञानाने बऱ्याच मोठ्या प्रमाणात स्त्रियांना आर्थिक प्रगती करण्यास सक्षम बनवले आहे.

**राजकीय प्रगती**

माहिती तंत्रज्ञानाच्या आजच्या काळात राजकीय वापर बराच वाढला आहे. स्त्रियांमध्ये राजकीय जाणिवा निर्माण करणे व त्याला प्रोत्साहन देण्याचे काम माहिती तंत्रज्ञान क्षेत्राने करणे गरजेचे आहे. बऱ्याच काळापासून स्त्रियांचे आवाज जे समाजाच्या बंधनाने दाबलेले होते. त्याला आवाज दिला पाहिजे. स्त्रियांच्या विविध समस्या या त्यांच्या प्रत्यक्ष राजकीय सहभागाशिवाय सुटणार नाही याची जाणीव निर्माण केली पाहिजे.

महिलांना मिळालेल्या राजकीय आरक्षणाने त्या प्रत्यक्ष राजकारणात पहिल्यांदा आल्या परंतु त्यांना आपले अधिकार कर्तव्य काय आहे याची जाणीव नव्हती. आज माहिती तंत्रज्ञानाचा वापर करून महिला पुढील दृष्टीकोन डोळ्यासमोर ठेवून काम करू शकतात.

माहिती तंत्रज्ञानाच्या आधारे महिला त्यांच्यासाठी असणाऱ्या विविध योजना, सोयी, विविध कायदे यांची माहिती मिळवू शकतात. पंचायती राज व्यवस्थेत उपस्थित विविध प्रश्न त्या मांडू शकतात. कुशल मार्गदर्शकांकडून त्यांची उत्तरे मिळवू शकतात.

माहिती तंत्रज्ञानाच्या आधारे त्यांना राजकीयदृष्ट्या सक्षम करण्यास मदत होईल.

**विविध क्षेत्रामध्ये माहिती तंत्रज्ञानाचा उपयोग**

**आरोग्य**

स्त्रियांच्या आरोग्य विषयक समस्या या पुरुषापेक्षा भिन्न आहेत. मासिक पाळी व गर्भधारणा हा स्त्रियांचा Wild zone अनुभव आहे. त्या विषयी विविध समस्या स्त्रियांमध्ये होतात. माहिती तंत्रज्ञानाच्या आधारे त्या समस्येवरील उपाय हे शोधले जाऊ शकतात.

प्रसुति ही एक महत्त्वाची समस्या आहे. माहिती तंत्रज्ञानाच्या आधारे ती योग्य प्रकारे केली जाऊ शकते. नवजात बाळ व मातेच्या संगोपनाविषयी माहिती मिळते.

विविध प्रकारचे आजार जसे HIV/AIDS, Cancer, TB यांच्या विषयी समुपदेशन व उपचार माहिती तंत्रज्ञानाने प्राप्त होतात.

**Nutrition आहार**

सकस आहाराची कमतरता हे महिलांच्या आरोग्य विषयक समस्येचे मुख्य कारण आहे. स्त्रियांना त्यांच्या जीवनाच्या विविध स्तरावर योग्य आहार देणे गरजेचे असते. जणे करून त्यांना समस्या निर्माण होणार नाही. गर्भावस्थेत त्यांना नियंत्रित आहाराची गरज असते. त्याविषयी माहिती त्यांना उपलब्ध होते.

**संस्कृतीचे जतन**

महिला या संस्कृतीच्या वहन करणाऱ्या आहेत. असे समजले जाते. आज बऱ्याच प्रमाणात संस्कृतीचा नाश होत चालला आहे. असे म्हणतात परंतु माहिती तंत्रज्ञानाच्या माध्यमातून आपली मुळ संस्कृतीचे जतन करून ठेवता येते.

**सारांश**

वरील विवेचनावरून असे पहावयास मिळते की, स्त्रियांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी आज माहिती तंत्रज्ञान हे प्रभावी उपयुक्त साधन आहे. स्त्रियांची प्रगती झाल्यास संबंध समाजाची परिणामी राष्ट्राची प्रगती होय.

**संदर्भ ग्रंथ**


- मानव संसाधन मंत्रालय, महिला व बाल कल्याण विभाग, www.wcd.ni.in
- नारी शोषण समस्या एवं समाधान – संपा. डॉ. राजकुमार, अर्जुन पब्लिकेशन हाऊस, नवी दिल्ली, २०१३
- आधुनिक राजनीतिक निबंध – डॉ. जी.पी. नेमा, डॉ. गोपाल प्रसाद, डॉ. श्रीमती राजेश जैन, विश्वभारती पब्लिकेशन, नवी दिल्ली.
- महिला एवं विकास – डॉ. राजकुमार

- विभिन्न क्षेत्रों में भारतीय महिलाएँ – माधवानंद सारस्वत, श्वेता मल्टीमीडिया, पिलानी, २०१०.
- Women Empowerment and Gender planning & Ashine Roy, Rajat Publication, New Delhi, 2003-
- Women Empowerment & R-L- Panigrahy, Dasarathi Bhuyan, Discovery Publication, New Delhi, 2006